UNIVERSITY OF MUMBAI

No.UG/ 274 of 2007.

**CIRCULAR:-**

A reference is invited to the Ordinances, Regulations and Syllabi relating to the Master of Arts (M.A) (Parts I & II) degree course *vide* Pamphlet No. 157 and to this office Circular No.UG/186 of 2000 dated 19th May, 2000 and the Head of the University Department of Marathi, the Principals of the affiliated colleges in Arts and Professor-cum-Director, Institute of Distance Education are hereby informed that the following recommendation made by the Board of Studies in Marathi at its meeting held on 29th March, 2007 has been accepted by the Academic Council at its meeting held on 13th April, 2007 *vide* item No. 4.53 to read as under :-

एम.ए. (भाग-१) च्या अभ्यासक्रमातील अभ्यासपत्रिका क्र. १- साहित्यप्रकाराचा अभ्यास विषयाची साहित्यप्रकार व यासाठी पुस्तके ही शैक्षणिक वर्ष सन २००७-२००८ पासून जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे निश्चित करण्यात यावीत.

MUMBAI-400 032

14th June, 2007

for I/c REGISTRAR

************

To,

The ~~and the~~ Head of the University Department of Marathi, the Principals of the affiliated colleges in Arts and Professor-cum-Director, Institute of Distance Education.

A.C/4.53 /13.04.2007

************

No.UG/274-A of 2007 14th June, 2007.

Copy forwarded with Compliments for information to:-

1) The Dean, Faculty of Arts.
2) The Chairperson, Board of Studies in Marathi

for I/c REGISTRAR

*********

Copy to :-

The Director, Board of College and University Development, . the Deputy Registrar (Eligibility and Migration Section), the Director of Students Welfare, the Executive Secretary to the Vice-Chancellor, the Personal Assistant to the Pro-Vice-Chancellor, the Registrar and the Assistant Registrar, Administrative sub-center, Ratnagiri for information .

The Officer on Special Duty and Controller of Examinations (10 copies), the Finance and Accounts Officer (2 copies ), Record Section (5 copies ), Publications Section (5 copies), the Deputy Registrar, Enrolment, Eligibility and Migration Section (3 copies ), the Deputy Registrar, Statistical Unit ( 2 copies), the Deputy Registrar (Accounts Section), Vidyanagari (2 copies ), the Deputy Registrar, Affiliation Section ( 2 copies ), the Director, Institute of Distance Education,( 10 copies) the Director University Computer Center (IDE Building ), Vidyanagari, (2 copies ) the Deputy Registrar ( Special Cell), the Deputy Registrar,(PRO) the Assistant Registrar, Academic Authorities Unit (2 copies )and the Assistant Registrar, Executive Authorities Unit (2 copies ). They are requested to treat this as action taken report on the concerned resolution adopted by the Academic Council referred to in the above Circular and that no separate Action Taken Report will be sent in this connection. the Assistant Registrar Constituent Colleges Unit (2 copies ), BUCT(1 copy ), the Deputy Account Unit V(1 copy ), the In-charge Director, Centralize Computing Facility (1 copy ), the Receptionist (1 copy), the Telephone Operator (1 copy), the Secretary MUASA (1 copy), the Superintendent, Post-Graduate Section ( 2 copies ), the Superintendent, Thesis Section (2 copies) .

Mmm/cir-iv/12407

Enclosure to item No. 4·53/13·4·1

# UNIVERSITY OF MUMBAI

## SYLLABUS IN THE SUBJECT OF

## MARATHI

### Paper – I (साहित्यप्रकाराचा अभ्यास)

### at M.A. (PART - I) examination

(With effect from the academic year 2007-2008, 2008-2009, 2009-2010)

Scanned with OKEN Scanner

# एम. ए.

## अभ्यासपत्रिका क्र. १

**विशिष्ट साहित्यप्रकार : नाटक**

गेली तीन वर्षे एम्. ए. भाग १ च्या अभ्यासक्रमामध्ये 'आत्मचरित्र' हा कथनपर साहित्यप्रकार नेमलेला होता. शैक्षणिक वर्ष २००७-००८ पासून २००९-२०१० पर्यंत **'नाटक'** हा साहित्यप्रकार नेमत आहोत.

**अभ्यासक्रमाचे स्वरूप :**

कोणत्याही साहित्यप्रकाराला एक तात्त्विक अंग असते. तसेच त्याला एक ऐतिहासिक अंग असते. या दोन अंगांच्या देवघेवीमधून प्रत्येक साहित्यप्रकराची जडणघडण होत असते. यादृष्टीने साहित्यप्रकाराच्या अभ्यासासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे सांगता येतील

क) साहित्यप्रकाराची संकल्पना : सैद्धांतिक विचार, संकेतव्यूह

ख) या सैद्धांतिक विचाराच्या प्रकाशात नेमलेल्या साहित्यकृतींचा प्रकारलक्ष्यी अभ्यास करणे.

ग) साहित्यप्रकाराची ऐतिहासिक जडणघडण

या तीन प्रमुख मार्गदर्शक तत्त्वांनुसार साहित्यप्रकाराच्या अभ्यासक्रमाची योजना पुढीलप्रमाणे आखता येईल.

- **साहित्यप्रकाराची संकल्पना : सैद्धांतिक विचार**

  १. साहित्य आणि साहित्यप्रकार : वर्गीकरणाची तत्त्वे, दृष्टिकोण

  २. नेमलेला विशिष्ट साहित्यप्रकार व इतर साहित्यप्रकार यांचे साम्यभेदाचे नाते.

  ३. नेमलेल्या साहित्यप्रकाराच्या प्रकार-उपप्रकारांचे विवेचन.

  ४. प्रकारनिष्ठ साहित्यसमीक्षेचा (Generic Criticism) प्राथमिक परिचय.

- **नेमलेल्या साहित्यकृतींचा प्रकारलक्ष्यी अभ्यास**

  १. साहित्यप्रकाराच्या सैद्धांतिक विचाराच्या प्रकाशात नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास करणे.

  २. नेमलेल्या साहित्यकृतीतून संबंधित साहित्यप्रकाराचे विशेष, लक्षणे, संकेत आदींचे स्वरूप स्पष्ट करणे.

  ३. नेमलेल्या साहित्यकृतींची प्रकारलक्ष्यी समीक्षा करणे.

  ४. नेमलेल्या साहित्यकृतींच्या आश्रयाने साहित्यप्रकाराच्या प्रकार-उपप्रकारांचा विचार करणे.

- **'साहित्यप्रकारा'ची ऐतिहासिक जडणघडण**

  १. नेमलेल्या साहित्यप्रकराची मराठी साहित्यातील ऐतिहासिक जडणघडण कशी झाली, याचे दिग्दर्शन करणे, प्रमुख स्थित्यंतरांचा विचार करणे.

  २. साहित्यप्रकाराच्या घडणीमागील व स्थित्यंतरामागील विचारप्रणाली वाङ्मयीन परंपरा, प्रवृत्ती, संकेतांचे उल्लंघन व सांस्कृतिक संदर्भ आदी गोष्टींचा विचार करणे.

  ३. साहित्यप्रकाराचे वाङ्मयेतिहासाशी व संस्कृतीशी असलेले नाते स्पष्ट करणे.

वरील मार्गदर्शक सूत्रे प्राध्यापकांनी आत्मसात करणे अपेक्षित आहे आणि नाटक या प्रयोगनिष्ठ साहित्यप्रकाराचे प्रत्यक्ष अध्यापन पुढील सूत्रांच्या आधारे करावयाचे आहे.

Scanned with OKEN Scanner

नाटक : एक प्रयोगनिष्ठ साहित्यप्रकार

● नाटक या साहित्यप्रकाराची संकल्पना : सैद्धांतिक विचार

१. साहित्य आणि साहित्यप्रकार

साहित्यप्रकाराची संकल्पना, साहित्यकृतींची वर्गवारी करणारी वर्गीकरण-तत्त्वे, आदेशात्मक (Perscriptive), वर्णनात्मक (Descriptive) दृष्टिकोण, काव्य, कथात्म साहित्य व नाटक आदी प्रमुख साहित्यप्रकार इत्यादी गोष्टींचा परिचय करून देणे.

२. नाटक आणि संबंधित इतर साहित्यप्रकार यांच्यामधील साम्यभेदाचे नाते स्पष्ट करणे.

३. नाटक या साहित्यप्रकाराचे स्वरूपविशेष

नाटक हा एक दृश्य, श्राव्य स्वरूपाचा संमिश्र व प्रयोगनिष्ठ कलाप्रकार आहे, या गोष्टीचे भान ठेवून नाटकाची व्याख्या करणे, नाटकाचे व्यवच्छेदक-लक्षण, त्याची उपलक्षणे, नाटकाचा संकेतव्यूह यासंबंधी विवेचन करणे यासंदर्भात भरताची नाटकाची अभिनयाधिष्ठित व्याख्या, ॲरिस्टॉटलची नाट्यसंकल्पना आदींचा वापर करणे.

नाटकाची नाट्यसंहिता आणि प्रयोग यांचे संबंधस्वरूप स्पष्ट करणे.

- **नाटक : स्वरूप आणि रचना**

  अ) नाट्यबीज - कथानकविचार

  आ) पात्रविचार

  इ) स्थल-काल (वातावरण) विचार

  ई) संवाद

  उ) भाषा

- **नाट्यसंहिता : प्रयोगविचार**

  नाट्यसंहिता, रंगभूमी, नट, दिग्दर्शक, प्रेक्षक आदी नाट्यांगांचे स्वरूप आणि नाट्यकार्य यांचे विवेचन करणे.

४. नाटकाचे प्रकार-उपप्रकार

नाटकाचे प्रकार-उपप्रकार कोणत्या वर्गीकरण तत्त्वानुसार कसे पडतात, याचे दिग्दर्शन करणे, उदाहरणार्थ -

- संरचनेच्या अंगाने : नाटक, एकांकिका, नाट्यत्रयी, गद्य नाटक, पद्य नाटक, संगीत नाटक, काव्यात्म नाटक
- अनुभवाची प्रकृती-जात : शोकात्मिका, सुखात्मिका, शोक-सुखात्मिका
- नाट्यगत आशय / अनुभव १) सामाजिक, राजकीय, पौराणिक, ऐतिहासिक नाटक २) अस्तित्ववादी, असंगत व्यस्ततापूर्ण मार्क्सवादी नाटक (अशा जातीच्या नाटकातील अनुभव तत्त्वज्ञानपर, विचारप्रणालीवर आधारलेला असतो.)
- नाट्यगत / शैलीच्या अंगाने :

  आविष्कार वादी, संस्कारवादी, यथार्थवादी इत्यादी.



Scanned with OKEN Scanner

- **नेमलेल्या नाट्यकृतींचा अभ्यास**

मार्गदर्शक तत्त्वे

१. नेमलेल्या नाट्यकृतींचा नाटक या प्रकाराच्या सैद्धांतिक विचाराच्या, संकेतव्यूहांच्या प्रकाशात अभ्यास करणे.

२. नाट्यकृतींतून व्यक्त होणारी नाटकाची लक्षणे, संकेत इत्यादींचा शोध घेणे.

३. नाट्यकृतीतील नाट्यबीज, नाट्य-प्रसंग, कथानक, पात्र, स्थलकालबद्ध यांचे नाट्यकार्य यांचे विवेचन करणे आणि या सर्व नाट्यांगामधून संघटित होणाऱ्या नाटकांचे संश्लेषित, एकात्म समष्टीरूप पाहणे.

नाट्यकृतींच्या शब्दसंहितेतील भाषिक व अभाषिक अंगे, रंगसूचना आदींचे नाटकातील कार्य कोणते ते स्पष्ट करणे.

४. नाटकाचे सामान्य गुण, जातितत्त्वे, सामान्य संकेतव्यूह ही प्रकारनिष्ठ समीक्षेची आधारभूत तत्त्वे होत. त्यांच्या आश्रयाने केलेल्या अभ्यासातून व समीक्षेतून नाटकाची प्रकारलक्ष्यी समीक्षा सहज सिद्ध होत जावी. तसेच नाट्यकृती, रूढ संकेतांचे पालन व प्रसंगी उल्लंघन करीत विशिष्टता प्राप्त करीत असतात, या गोष्टीचेही सोदाहरण विवेचन करणे.

५. नाट्यकृतींचे उपप्रकार : नेमलेल्या नाट्यकृती कोणत्या उपप्रकारात मोडतात याचे साधार विवेचन करणे, नाटकाचा एक उपप्रकार म्हणून या नाट्यकृतींचा विचार करणे. उदा. 'संगीत शारदा' या नाटकाचा एक संगीत नाटक, सामाजिक नाटक म्हणून विचार करता येईल.

६. नेमलेल्या नाट्यकृतींचे नाटकाच्या इतिहासातील ऐतिहासिक स्थान व कार्य यांचा विचार करता येईल.

- **नेमलेल्या नाट्यकृती**

१. संगीत शारदा - गो. ब. देवल (संगीत नाटक, सामाजिक नाटक)

२. एक शून्य बाजीराव - चिं. त्र्यं. खानोलकर
(शोकांतिका व प्रतिनायक, प्रतिविदूषक व रचनाबंध)

३. घाशीराम कोतवाल - विजय तेंडुलकर
(राजकीय नाटक, प्रयोगात लोककलांचे उपयोजन)

४. आरण्यक - रत्नाकर मतकरी (काव्यात्म नाटक)

५. लेकुरे उदंड झाली - वसंत कानेटकर ( सुखात्मिका, संगीताचा वेगळा वापर)

६. युगान्त - महेश एलकुंचवार (त्रिनाट्यधारा, ग्रीक नाट्यसंकेत)

७. ढोलताशे - चं. प्र. देशपांडे
(चर्चात्मक नाटक, समकालीन समाज-संस्कृतीचा परिणाम)

८. साठेचं काय करायचं ? - राजीव नाईक (चर्चात्म नाटक, बदलते समाजवास्तव)

९. शोभायात्रा - शफाअत खान (हास्य शोकात्मिका)

Scanned with OKEN Scanner

- **नाटक या साहित्यप्रकाराची ऐतिहासिक जडणघडण**

१. येथे नाटक या प्रकाराचा समग्र इतिहास अभिप्रेत नाही. मराठी नाटकाच्या व रंगभूमीच्या इतिहासात नाटकाच्या संकल्पनेमध्ये, संकेतव्यूहामध्ये जे महत्त्वाचे बदल व स्थित्यंतरे झाली. त्यांचे स्वरूप स्पष्ट करणे.

अ) किर्लोस्करांच्या नाटकाचे नमुनारूप (मॉडेल)

आ) खाडिलकर - गडकरी यांचे नाटक

इ) अत्रे यांचे नाटक

ई) नवनाट्य इत्यादी.

२. नाटकाचे विषय, कथानक, नायक-प्रतिनायक, संवाद, भाषा, नाट्यतंत्र इत्यादी नाट्यांगांत कोणते बदल झाले, कोणत्या संकेतांचे उल्लंघन झाले याचा विचार करता येईल.

३. साहित्य-कला व समाज-संस्कृती यांच्या क्षेत्रातील नव्या प्रेरणा-प्रवृत्ती, नव्या विचारप्रणाली आदींच्या प्रभावामुळे नाटकाच्या इतिहासात कोणती परिवर्तने झाली यांचा विचार करता येईल.

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप -

गुण - १०० - अवधी ३.०० तास

एकूण ५ प्रश्न विचारावेत.

प्रत्येक प्रश्नाला अंतर्गत पर्याय असावा.

पहिला प्रश्न अनिवार्य असावा. प्रस्तुत प्रश्न सैद्धांतिक विवेचनावर तसेच ऐतिहासिक जडणघडणीवर आधारित असावा.

प्रश्न क्र. २ ते ५ - नेमलेल्या नाट्यकृतींच्या **प्रकारलक्ष्यी अभ्यासावर** आधारलेले असावेत. यांपैकी काही केवळ एकेका नाट्यकृतीवर विचारले जावेत. तसेच काही प्रश्न नाट्यघटकांच्या आश्रयाने एकापेक्षा अधिक नाट्यकृती एकत्रित करून त्यावरही विचारले जावेत. नाटकांचे अंतर्गत पर्याय सतत बदलले जावेत.

संदर्भ


- नाट्यविमर्श - के. नारायण काळे
- मराठी रंगभूमी : मराठी नाटक - घटना आणि परंपरा. संपा. के. ना. काळे व इतर
- ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र - गो. वि. करंदीकर
- रङ्गनायक - संपा. राजीव नाईक, विजय तापस, प्रदीप मुळये
- अभिनव काव्यप्रकाश - रा. श्री. जोग
- समीक्षेची नवी रूपे - गंगाधर पाटील
- कांटची सौंदर्यमीमांसा - रा. भा. पाटणकर
- भरतमुनींचे नाट्यशास्त्र - गोदावरी केतकर
- भारतीय साहित्यशास्त्र - ग. त्र्यं. देशपांडे
- 'नाटक : स्वरूप आणि तंत्र विचार' - मराठी नाट्यतंत्र, संपा. मो. द. ब्रह्मे




Scanned with OKEN Scanner

- 'नाट्यविषयक तात्त्विक विचार', मराठी नाट्यसमीक्षा, संपा. रा. शं. वाळिंबे.
- नाटक एक चिंतन - वसंत कानेटकर
- 'नाटक एक होणे' - अशोक केळकर, अनुष्टुभ (नाट्यविशेषांक) मे-जून १९८७.
- 'नाटक म्हणजे काय?' - वसंत दावतर, अनुष्टुभ (नाट्यविशेषांक) मे-जून, १९८७
- रस-भाव-विचार - र. पं. कंगले
- नाटकातील चिन्हं - राजीव नाईक
- खानोलकरांची नाट्यसृष्टी - पुष्पलता राजापुरे-तापस, प्रतिमा प्रकाशन, २००४
- The Elements of Drama - J. L. Styan, London
- The field of Drama - Martin Esslin, Cambridge University Press, London
- The idea of a Theatre - Francis Forgusson, 1949 : Princeton University Press
- Feeling and Form - Eric Bentley, 1965 : Methueu & Co. London
- The Life of the Drama - Eric Bently 1965 : George E., Harrap and Co. London
- The Theater and the Dramatic Theory - Allardyee Nicoll,
  1962: George E., Harrap & Co. London
- An Anatomy of Drama - Martin Esstin
  1976 : Sphere Books ltd. (ABACUS edition), London
- Comedy - L. J. Potts.
  1960 (IIIrd impression) : Hutohinson University Library, London.


---X---

Scanned with OKEN Scanner